# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

MERC

केंद्र क्र.१३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५
**दूरध्वनी** २२१६ ३९६४/२२१६ ३९६५ **फॅक्स:** ०२२-२२१६३९७६
**ई-मेल :** mercindia@merc.gov.in **वेबसाईट** www.merc.gov.in


**जाहिरात क्र. ०७/२०२२-२३**

## जाहीर सूचना

**सन २०२१ चे प्रकरण क्र. ७४**

**विद्युत अधिनियमम, २००३ च्या कलम १८ अंतर्गत गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि.च्या विनियमांच्या विशिष्ट अटींमध्ये सुधारणा करण्यावर अभिप्राय मागविण्याबाबत**

१. गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि. **(जीईपीएल)**, हे एसईझेड मानीव वितरण परवानाधारक आहेत आणि सन २०१४ च्या प्रकरण क्र. १९८ मध्ये दि. २६ ऑक्टोबर, २०१५ रोजी दिलेल्या आदेशान्वये, आयोगाने, जीईपीएल यांना ऐरोली येथील अधिसूचित केलेल्या माहिती तंत्रज्ञान /माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी दिलेल्या मानीव वितरण परवानाधारकाच्या दर्जाची नोंद, आपल्या पटलावर घेतली आहे. भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालयाने दिनांक १ जून, २०२१ रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनेच्या अनुषंगाने, जीईपीएल यांनी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे (आयोग) सुधारित एसईझेड क्षेत्र सूचित करण्यासाठी त्यांच्या विनियमांच्या विशिष्ट अटींमध्ये सुधारणा करण्याकरिता अर्ज केला आहे. या अधिसूचनेद्वारे, जीईपीएलच्या एसईझेड क्षेत्रामध्ये १६.५२ हेक्टर्स वरुन ८.०४ हेक्टर्स अशी सुधारणा करण्यात आली आहे आणि हे सुधारित क्षेत्र समाविष्ट करण्यासाठी त्यांच्या विद्यमान विनियमांच्या विशिष्ट अटींमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

२. जीईपीएलने, विद्युत अधिनियम, २००३च्या कलम १८(२)(अ) अंतर्गत आवश्यक असल्यानुसार, सूचना किंवा हरकती मागविण्यासाठी त्यांच्या अर्जाची सूचना (१) बिझनेस स्टॅण्डर्ड (इंग्रजी), (२) ॲक्टिव्ह टाइम्स (इंग्रजी), (३) प्रात:काल (मराठी) आणि (४) मुंबई लक्षदीप (मराठी) या वर्तमानपत्रांमध्ये दिनांक २३ नोव्हेंबर, २०२१ रोजी प्रसिध्द केली होती. जीईपीएलच्या सदर अर्जावर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लिमिटेडने त्यांचे अभिप्राय/सूचना सादर केल्या आहेत.

३. जीईपीएलने सादर केलेला अर्ज आणि अन्य कागदपत्रांचे मूल्यमापन केल्यानंतर, आयोगाची सकृतदर्शनी खात्री झाली आहे की, विद्युत अधिनियम, २००३ आणि त्याखाली तयार करण्यात आलेल्या विनियमांमध्ये आखून दिलेल्या आवश्यकतांचे पालन करण्याच्या अधीन राहून, जीईपीएलच्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटींमध्ये सुधारणा करता येईल.

४. जीईपीएलच्या अर्जाची प्रत, त्यासोबतच्या परिशिष्ट आणि जोडपत्रांसह, आयोगाच्या **www.merc.gov.in** या संकेत-स्थळावरुन किंवा मविनिआ (कामकाज प्रचालन) विनियम, २००४ मध्ये ठरवून देण्यात आलेल्या कार्यपध्दतीचे पालन करुन आयोगाच्या कार्यालयात कोणत्याही व्यक्तीला पाहता येईल.

५. प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीर सूचनेच्या संबंधात, इच्छुक व्यक्तिंनी ही सूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून (दिनांक : १३ एप्रिल २०२२) २१ दिवसांच्या आत त्यांच्या सूचना/हरकती, इंग्रजी किंवा मराठी भाषेत, सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांना १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई -४००००५ या पत्त्यावर इलेक्ट्रॉनिक माध्यम/**ehearing@merc.gov.in/secretary@merc.gov.in** ई-मेलद्वारे पाठवाव्यात. विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकानंतर प्राप्त झालेल्या सूचना आणि/किंवा हरकती विचारात घेण्यात येणार नाहीत.

६. वरील परिच्छेद ५ नुसार, अभिप्राय/हरकती पाठविणाऱ्या व्यक्तिला त्याचे म्हणणे जाहीर ई-सुनावणीमध्ये व्यक्तिश: आयोगासमोर मांडावयाचे असल्यास सूचना/हरकती दाखल करताना तसे विशेषत्वाने नमूद करावे. अशा प्रकरणी, वैध ई-मेल आयडी आणि मोबाईल क्रमांक देणे अनिवार्य राहील. आयोग, आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार, अशा प्रेषक/आक्षेपकाला ई-सुनावणीमध्ये त्याचे म्हणणे मांडण्याची परवानगी देईल. जाहीर ई-सुनावणीत भाग घेणाऱ्या सर्व व्यक्ती आयोगाने दि. १७ सप्टेंबर, २०२० रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे जाहीर सुनावणीस हजर राहण्यासाठी अधिसूचित केलेल्या मार्गदर्शक सूचनांमधील तरतुदींचे पालन करतील.

७. **मंगळवार दि. १७ मे, २०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता** व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे घेण्यात यावयाच्या ई-सुनावणीमध्ये जीईपीएलच्या विशिष्ट अटींच्या विनियमांमध्ये सुधारणा करण्यासाठीचा अर्ज विचारात घेण्यात येईल. या प्रयोजनासाठी वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

**सही/-**

ठिकाण : मुंबई **(अभिजीत देशपांडे)**

दिनांक : १३/०४/२०२२ **सचिव, मविनिआ**